# सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुंकळ्ळी – गोवा

## मराठी विभाग

# युवांकुर

मराठी विभागाचे साहित्यिक नियतकालिक,
आपल्या हक्काचे व्यासपीठ

अंक ६, वर्ष २०२४



**अनुमोदक :** प्रभारी प्राचार्य अविनाश रायकर

**संपादन मंडळ :**

कु. सलोनी फळदेसाई

कु. अनामिका सावंत

सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गावकर

सहायक प्रा. सरिता झोरो

# अनुक्रमणिका


❖ **संपादकीय**

❖ **कविता**

१. पारिजात / अनामिका सावंत
२. आई / अनामिका सावंत
३. चहा आणि बरंच काही / अनामिका सावंत
४. दुरावा / पूजा दळवी
५. कविता म्हणजे काय? / पूजा दळवी
६. अशी बाई तू नाही / पूजा दळवी
७. आई / सलोनी फळदेसाई
८. देशधर्म / सलोनी फळदेसाई
९. मैत्री / सलोनी फळदेसाई
१०. प्रेरणा / सलोनी फळदेसाई
११. गणेश चतुर्थी / सलोनी फळदेसाई
१२. मुलगी होणं सोपं असतं का ? / प्रियंका च्यारी
१३. पाऊस / अश्मीता परवार
१४. जननी / किर्ती वेळीप
१५. पाऊस / अदिती नाईक

❖ **निबंध**

१. पुस्तकांचे महत्त्व / सलोनी फळदेसाई
२. आनंदी, सुखी, समृद्ध जीवनासाठी / सलोनी फळदेसाई
३. माझे आवडते लेखक / जयराम काळे
४. आठवणीतला एक दिवस/ अनामिका सावंत
५. लिंगभाव समानता : वास्तव की भ्रम ? / शिंधिया गावकर
६. आठवणीतला एक दिवस/ पूजा दळवी
७. श्रावण महिन्यातील सण आणि उत्सव / कनिष्का देविदास
८. धालो / गौरिशा काकोडकर
९. जन्माष्टमी / मनस्वी गोसावी
१०. एक गोमंतकीय आख्यायिका / भावना नाईक
११. शिक्षणासाठीची धडपड / अनिशा गावकर


**।। शब्दची आमुच्या जीवाचे जीवन**
**शब्दे वाटू धन जनलोका ।।**

~संत तुकाराम

# संपादकांच्या खिडकीतून डोकावताना..

प्रिय वाचकहो..

मराठी विभागाच्या ‘युवांकुर’ e-नियतकालिकाचा हा सहावा अंक. मागच्या पाच अंकांना आपण भरघोस प्रतिसाद देऊन आम्हाला उपकृत केलेले आहे. लिहित्या हातांना आणि आस्वादक वाचकांना ह्या नियतकालिकाच्या रूपात एक उत्तम व्यासपीठ प्राप्त झालेले आहे याचा आनंद आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी ह्या माध्यमाचा पुरेपूर लाभ घेताना पाहून समाधान वाटते. एखाद्या लोलकासारखी आपल्या प्रतिभेच्या इंद्रधनुषी रंगांची निर्मिती विद्यार्थी करण्याचा प्रयत्न करतात ही अत्यंत महत्त्वाची बाब वाटते. मराठीचा हा ध्यास सदैव ऊरी बाळगून प्रगतीचे शिखर गाठूया..

*“माझ्या मराठी मातीचा*

*लावा ललाटासी टिळा*

*हिच्या संगाने जागल्या*

*दऱ्याखोऱ्यातील शिळा ”*

*~कवी कुसुमाग्रज*

मनस्वी आभार,

संपादन मंडळ



# कविता

## पारिजात

अनामिका सावंत (तृतीय वर्ष, कला शाखा)

पारिजाताचा सडा पसरला

सुगंध सगळीकडे दरवळला

पारिजाताचा सडा पाहुनी

जणू स्वर्गच जाणवला

प्रेमाची ही खूण सांगते

पारिजाताचा सडा

सर्वांचे मन मोहून घेतो

शुभ्र रंग त्याचा

नाजूक ते फुल

रात्रीच फुलते

विष्णू देवाला आवडते

म्हणून तुळशीपाशी रोवले जाते

ओंजळीत सडा घेऊनी

उरी कायम ठेऊन घ्यावी

सुंदर या फुलाची जादू

साऱ्यांना जाणवावी



# आई

अनामिका सावंत (तृतीय वर्ष, कला शाखा)

ए ! आई

आणखी किती ग करशील?

सगळ्यांसाठी किती धडपडशील?

मुलांचा पसार तू आवरशील

बाबांचा डबा तू बनवशील

मग स्वतःसाठी कधी वेळ काढशील?

तुझं प्रेम ग आई

वेगळंच आहे

तुला समजणं हे कठीणच आहे

सगळ्यांची आवड तुला बरोबर कळते

पण स्वतःला आवडेल असं कधी बरं तू वागतेस?

तुझ्या काळजीमुळे आम्ही सावरलो

वेळेत तुझं ऐकलं म्हणून आज फुललो

तुझ्या हृदयातल्या कळा

समजतात ग मला

नेहमी देवाकडे हेच मागणे

सुखी ठेव माझ्या कुटुंबाला.



## चहा आणि बरंच काही..

अनामिका सावंत (तृतीय वर्ष, कला शाखा)

सांजवेळेला पसरलेली कोवळी किरणे

खिडकीला येऊन धडकली

टेबलवरच्या चहा बिस्कीट सोबत

दिवसभरातील गोष्टींची भेळ सजवली

थकलेल्या या मनाला

गार वाऱ्याची सोबत लाभली

निवांत घेतलेल्या विसाव्याने

तुझी आठवण काढली



चहावरच्या वाफेसारखं

दुःख हे निघून जावं

साखरेसारखं सुखाने विरघळून

जीवन गोड बनवावं

गरम चहाचा चटका बसेल

याची भीती तर असतेच

पण तोच चहा सांभाळून प्यालो

तर त्याची गोडी समजते

आयुष्यातल्या थंड गरम

प्रश्नांची उत्तरे

नक्कीच एका

चहाच्या घोटाने सोडवली

भणाणलेल्या डोक्याला

एकदाची शांतता लाभली

# दुरावा

पूजा दळवी (द्वितीय वर्ष, कला शाखा)

डोळे भरून रडताना

तू मला कधी पाहिलेच नाही..

कारण पाऊसात भिजताना

तू मला कधी रोखलेच नाही..

क्षणभरासाठी का होईना

पण माझे दुखणे तूला कळलेच नाही..



अश्रू आवरले नाहीत जरी पावसात

तरी तुझ्या समोर ते कधी गळलेच नाही..

माझ्या नजरेने तू मला जरा ओळखावे असे वाटले

पण माझ्या नजरेला तुझी नजर कधी भिडलीच नाही..

रोजच्या ह्या सगळ्या जगण्यात

शेवटी मी माझी मला कधी भेटलेच नाही..

शेवटी मी माझी मला कधी भेटलेच नाही.

## कविता म्हणजे काय?

पूजा दळवी (द्वितीय वर्ष, कला शाखा)

कविता म्हणजे मी की
माझ्यात हरवलेली ती ?

कविता म्हणजे अनुभव की
माझ्या वास्तव्यातले ते रहस्य ?

कविता म्हणजे काव्य की
माझ्या मनातले ते भाव?



कविता म्हणजे शहर की
आपलसं वाटणारं ते गाव?

कविता म्हणजे फक्त शब्द की
शब्दातून पेटणारी ती वात?

कविता म्हणजे नाव की
माझ्यातले ते वरदान?

# अशी बाई तू नाही

पूजा दळवी (द्वितीय वर्ष, कला शाखा)

स्वतःला विसरून चालणारी

न काही बोलणारी

पटलं नाही तरी हो म्हणणारी

अशी बाई तू नाही

स्वतःचा त्याग करणारी

दुःखही पोटात घेणारी

गप्प बसून सर्व काही सोसणारी

अशी बाई तू नाही



स्वतः झुरत

सहनशीलपणे

दुसऱ्यांच्या सुखासाठी स्वतःचे अस्तित्व विसरणारी

अशी बाई तू नाही

अपमान निमूट गिळणारी

गपचूप आतल्या आत रडणारी

मनी भयभीत होऊन जगणारी

अशी बाई तू नाही

# आई

सलोनी फळदेसाई (द्वितीय वर्ष, कला शाखा)

दिवस उजाडण्या अगोदर
करते सुरूवात ती कामाला
सर्वांची मनोकामना पूर्ण करते
कमी पडू देत नाही काहीही आम्हाला



न बोलताच सगळं काही
समजून घेते ती
चेहऱ्यावर नियमित हास्य ठेवून
बोलते सगळ्यांशी ती

भरपूर वेदना सहन करून
नवजात शिशूला जीवनात आणते
त्याला घडवण्यासाठी मात्र
तिचे आयुष्य निघून जाते

आईसारखं प्रेम, आईसारखी माया
कुणीच करू शकत नाही
देवाला सगळीकडे असणं शक्य नाही,
म्हणूनच त्याने सगळ्यांच्या आयुष्यात पाठवली आई

## देशधर्म

सलोनी फळदेसाई (द्वितीय वर्ष, कला शाखा)

चंदनाहून सुगंधित आहे

भारत देशाची माती

कित्येकांनी त्याच्यासाठी दिल्या

आपल्या प्राणांच्या आहुती

शुभ्र, केशरी, हिरवागार राष्ट्रध्वज

आहे भारत स्वातंत्र्याचे प्रतीक

महान पुरूषांनी आपली रक्ते वाहिली

मार सोसला, क्रांती घडविली अधिक



गंगा, यमुना, गोदावरी

झुळझुळ वाहतात नद्या

जल्लोष माझ्या देशाचा

गातो आहे वारा

अशोकचक्र असलेल्या चिन्हाचा

तिरंगी अमर ध्वज फडकू दे

तिरंगा माझा झेंडा

आता उंच उंच लहरू दे

## मैत्री

सलोनी फळदेसाई (द्वितीय वर्ष, कला शाखा)

गुलाबासारखी असावी मैत्री
नेहमी खुलत राहणारी
काट्यांसारखी नसावी ती
सतत टोचत राहणारी

शिखरासारखी असावी मैत्री
नेहमी अजिंक्य राहणारी
वाळूसारखी नसावी ती
झटकन उडून जाणारी



मैत्री असावी सागरासारखी
अफाटपणे वाहणारी
नसावी मैत्री नदीसारखी
नेहमी मार्ग बदलणारी

न बोलताच सगळं काही
समजून घेणारी असावी मैत्री
सुख - दुःखाच्या क्षणी
साथ देणारी असावी

# प्रेरणा

सलोनी फळदेसाई (द्वितीय वर्ष, कला शाखा)

प्रेरणा म्हणजे दरवळणाऱ्या फुलांचा गंध,

एक प्रेमळ सुगंध

प्रेरणा म्हणजे भलीमोठी वाट

जसा चढ-उताराचा घाट

प्रेरणा म्हणजे ममतेचे वात्सल्य, आईची माया

जशी तरूची छाया

प्रेरणा म्हणजे दिवसाची एक नवी पहाट

पावसाळ्यात गडगडणारा गडगडाट

प्रेरणा म्हणजे चित्रकाराने रेखाटलेले सुंदर चित्र

मुखावर आलेलं गोड स्मित

प्रेरणा म्हणजे सागरकिनारा

जसा पाण्याचा फवारा



## गणेश चतुर्थी

सलोनी फळदेसाई (द्वितीय वर्ष, कला शाखा)

तब्बल एक वर्ष पाहावी
लागते त्याची वाट
भाद्रपदाच्या सुरूवातीला
आगमन होते त्याचे थाटात

येताना आनंद, सुख - शांती
घेऊन येतो
जाताना तर भक्तांचे
विघ्न दूर करुन जातो



गजवदन, वक्रतुंड, लंबोदर
अशी कित्येक नावे त्याची
त्याच्यावर नजर पडताच
मने प्रसन्न होतात सगळ्यांची

पताका, माटोळी, फटाक्यांनी
करतात त्याचे स्वागत
तो मात्र मोदक खाताना
नाही कोणाला बघत

तुला पाहताच बाप्पा
वाटतं आम्हांला असं
तुला सोबत ठेवायचं
वर्षाच्या प्रत्येक दिवस

## मुलगी होणं सोपं असतं का?

प्रियंका च्यारी (द्वितीय वर्ष, कला शाखा)

मुलगी म्हणून जन्माला आली
की तिला लक्ष्मी म्हटले जाते
मग का बरं दोष दिला जातो तिलाच?

मोठी झाली की घरातले म्हणतात
"मुलगी आहे तू रात्री उशिरापर्यंत का फिरतेस?"
मुलगी झाली म्हणून काय आम्ही जगणं सोडायचं का?



लहानपणी मेकअप केला तर म्हणतात
"मोठी झाल्यावर काय ते कर"
मोठेपणी केलं तर म्हणटात किती ते नखरे!

बाहेर फिरायला गेलो तर नको ते प्रश्न
घरातच राहीले तरीही नको ते प्रश्न
जायचं तर मग कुठे आणि केव्हा जायचं ?

लग्न होऊन
आपली माणसं सोडून,
दुसऱ्या घरी जाऊन घर सावरते

हे सोप्पं असतं का?
खरंच !
मुलगी होणं सोपं असतं का?

# पाऊस

अश्मिता परवार (द्वितीय वर्ष, कला शाखा)

गडद गडद काळे मेघ

पाऊस पडतोय जोरदार

गडगडाटात चमणाऱ्या चिखलाचा

पसरलाय सुवास

हातात कूकीझसह एक कप कॉफी

नि दवबिंदू ओले माझ्या आठवणीत

आठवणीत हरवते, पडते, सावरते

ह्या सगळ्यात सोबत मात्र

फक्त पाऊस..



# जननी

किर्ती वेळीप (तृतीय वर्ष, कला शाखा)

संपूर्ण जगासाठी आहे ती जागी
करते सगळ्यांनाच मायेची लाडी
घरात शिजवते ती अन्नाची कणी
मुलांना देते ती शिक्षणाची गोडी

आयुष्य घडवते, ममत्व पाझरते
तिच्या मुळे होते हिरवी सृष्टी
वाईट संकटात देते ती
सगळ्यांची साथ

गृहिणीच्या रूपात येते
करते ती रक्षण हजारो स्त्रियांचे
मनात तिच्या स्मरते माणुसकीचे विचार

प्रत्येक क्षणी
येते तिची आठवणी
तिच्या शिकवणीने दाखवली
जीवनाची सुखद वाट...



## पाऊस

अदिती नाईक (द्वितीय वर्ष, कला शाखा)

पाऊस पडतोय

एक बाहेर

एक आत

एकटक मी बघते

दुःखाला भिजताना

धबधब्यासारखं हे दुःख

तो विचारतो

“का तू नाही व्यक्त होत?”

ती हसते

दुःख साठवलेल्या

पावसासारखीच





# निबंध

## पुस्तकांचे महत्व

सलोनी फळदेसाई (द्वितीय वर्ष, कला शाखा)

पुस्तक म्हटले तर आमच्या डोळयासमोर ज्ञानाचे भांडार उभे राहते. पुस्तक हे माणसाचे सर्वात चांगले मित्र आहे. पुस्तके ही आपली मार्गदर्शक असतात. म्हणजेच आपल्याला वेगवेगळया प्रकारे दिशा दाखवायची शक्ती पुस्तकांमध्ये असते. आपल्यावर संस्कार करणाऱ्या आईला आपण गुरु मानतो तसेच पुस्तकाला गुरु मानले तरी काहीच हरकत नाही. कारण पुस्तकांमुळेच माणूस घडू शकतो. पुस्तके आपल्यावर खोलवर परिणाम करतात आणि आपला बौद्धिक व मानसिक विकास घडवून आणतात.

पुस्तके ही विविध प्रकारची असू शकतात जसे की शिक्षणासाठी वापरतो ती वेगळया प्रकारची असतात, धार्मिक कारण्यासाठी वेगळी पुस्तके असतात. इतिहासाची वेगळी पुस्तके असतात, काही लोकांच्या जीवनावर सुद्धा पुस्तके असतात त्याला आपण जीवनचरित्र असे म्हणतो. लहान मुलांच्या गोष्टी, काल्पनिक गोष्टी, आत्मचरित्र, कविता संग्रह अशी कित्येक पुस्तके असतात. अशा प्रकारे पुस्तकांचे भांडार हे खूप मोठे आहे आणि यापासून आपण वेगवेगळी माहिती प्राप्त करू शकतो. विविध पुस्तके वाचल्यामुळे आपल्या ज्ञानात भर पडतेच परंतू पुस्तक ही एक अशी देणगी आहे जी आपले शब्दसंग्रह, वाचनाची एकाग्रता या सर्व गोष्टी सुधारते. आपण जर वेगवेगळी पुस्तके वाचली तर त्या पुस्तकांमध्ये खूप चांगले विचार असतात आणि त्या विचारांच्या सहाय्याने आपल्या व्यक्तिमत्वामध्ये चांगले बदल घडवून आणू शकतो.

पुस्तक वाचनाचे खूप फायदे आहेत. सर्वप्रथम म्हणजे ते विविध विषयांवर आपले ज्ञान सुधारते. शिवाय ते आपल्याला शहाणे बनवते. जेव्हा आपण नवीन काही शिकतो. पुस्तके आपल्या सर्जनशीलतेला चालना देतात. ते आम्हाला पूर्णपणे नवीन बाजू शोधण्यास मदत करतात.ते आमचे

लेखन कौशल्य देखील वाढवतात. तसेच पुस्तकांच्या वाचनामुळे आपला आत्मविश्वास वाढतो. पुस्तके आम्हाला वादविवाद, भाषणे, प्रश्नमंजुषा इत्यादींसाठी मदत करतात.

आपल्या जीवनामध्ये प्रत्येक पुस्तकाला महत्व आहे आणि आपण सगळ्यांनी वेगवेगळया प्रकारची पुस्तके वाचली पाहिजेत. ज्यामुळे आपल्याला वेगवेगळया प्रकारची माहिती मिळेल आणि आपल्या ज्ञानाचे आणि शब्दांचे भांडार वाढेल. पुस्तके आपल्याला एक नवीन दृष्टीकोन देतात आणि गोष्टींची सखोल माहिती देतात. त्याचा आपल्या व्यक्तिमत्वावरही सकारात्मक परिणाम होतो. आपण प्रत्येकाला अधिकाधिक पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.



## आनंदी, सुखी, समृध्द जीवनासाठी...

सलोनी फळदेसाई (द्वितीय वर्ष, कला शाखा)

आनंद, सुख आणि समृद्धी हे प्रत्येक माणसाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटक आहेत. प्रत्येक माणूस या तीनही घटकांचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करतो.  आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येक जण आनंदी आणि सुखी जीवन जगण्याचे स्वप्न बघत असतो.

आनंद हा बाहेरील नसून तो आंतरिक असतो. आपण किती आनंदी आहोत, नकारात्मक गोष्टींमध्ये आपण किती आनंदात राहतो हे सगळं आपल्यावर असतं. आनंद ही मनाची स्थिती आहे. तो बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसून, तो मनाच्या आनंदावर अवलंबून असतो. आंतरिक शांती, समाधान आणि कृतज्ञता हे आनंदाचे प्रमुख घटक आहेत. आपल्याकडे असलेल्या गोष्टींचे मूल्य जाणून घेणे, छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधणे आणि सकारात्मक विचारांचा अवलंब करणे ह्या आनंदी जीवन जगण्याच्या काही महत्त्वाच्या पायऱ्या आहेत.

"आपण किती आनंदात राहतो याला महत्त्व नाही,

तर आपल्यामुळे कितीजण आनंदी राहतात याला महत्त्व आहे.''

आपण जसे आनंदी राहतो त्याचप्रमाणे आपण दुसऱ्यांना आनंदी ठेवले पाहिजे. सुख हे आनंदापेक्षा थोडे अधिक व्यापक आहे. ते शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणावर आधारित असते. स्वास्थ शरीर, निरोगी मन आणि सकारात्मक संबंध हे सुखी जीवनाचे आधार आहेत. योग्य आहार, व्यायाम, पुरेपूर झोप आणि मनोरंजन यांच्याद्वारे आपण शारीरिक आणि मानसिक आरोग्य कायम राखू शकतो, तर आपल्या कुटुंब मित्र आणि समाजाशी सकारात्मक संबंध विकसित करून आपण सामाजिक कल्याण वाढवू शकतो.

समृद्धी ही आर्थिक स्थैर्य आणि भरभराटाशी संबंधित आहे. ती आपल्याला आपल्या गरजा आणि इच्छा पूर्ण करण्याची क्षमता प्रदान करते. तर समृद्धी आपल्याला आनंदी आणि सुखी जीवन जगण्यासाठी आवश्यक साधन संपत्ती प्रदान करते. त्यामुळे या तिन्ही घटकांचा समतोल साधणे.  आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय असले पाहिजे आपल्या जीवनात आनंद सुख आणि समृद्धी आणण्यासाठी आपल्याला काही प्रयत्न करावे लागतात.

सकारात्मक दृष्टीकोण, कृतज्ञता, स्वतःवर विश्वास, धेय निश्चिती आणि कठोर परिश्रम ह्या त्यातील काही महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

या गोष्टी आपल्या जीवनात प्रभावीपणे लागू केल्यास आपण आनंदी, सुखी आणि समृद्ध जीवन जगू शकतो

याशिवाय आपल्याला आपल्या आजूबाजूच्या लोकांना आनंदी, सुखी आणि समृद्ध बनवण्यासाठी प्रेरणा देणे, आवश्यक आहे. आपण आपल्या कृती आणि वर्तनाद्वारे एक सकारात्मक वातावरण निर्माण करू शकतो जे इतरांना प्रेरणा देईल.

आनंदी, सुखी आणि समृद्ध जीवन हा एक प्रवास आहे. एक ध्येय नाही. आपल्याला दररोज या दिशेने प्रयत्न करत रहावे लागतील. आपण यशस्वी होऊ किंवा अपयशी आपण नेहमीच आनंद, सुख आणि समृद्धी शोधण्याचा प्रयत्न करावा. कारण या तिन्ही घटकांचा समतोलच आपल्या जीवनाला एक वेगळे वळण देणार. आयुष्यात कितीही कठीण प्रसंग आले तर त्या परिस्थितीला आनंदाने सामोरे गेले पाहिजे. आयुष्यातल्या लहान-सहान गोष्टीत मोठा आनंद आणि सुख शोधून काढले पाहिजे. आपण स्वतःसाठी नव्हे तर इतरांसाठी सुद्धा जगले पाहिजे. कारण आनंद आणि सुख फक्त स्वतःच्या खुशीत नव्हे तर इतरांच्या कुशीत सुद्धा मिळतो. आनंद, सुख आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी आपण स्वतःमध्ये प्रथम परिवर्तन केले पाहिजे, कारण केवळ बोलल्याने ते आपल्याला आपोआपच मिळणार नाही तर त्यासाठी परिश्रम घेणे सुद्धा तेवढेच गरजेचे आहे.



## माझे आवडते लेखक...

जयराम काळे (प्रथम वर्ष, कला शाखा)

एक लेखक आपल्या शब्दांनी, विचारांनी व मार्गदर्शनाने अनेक लोकांचे आयुष्य बदलतात. असेच माझे एक आवडते लेखक म्हणजे शिवाजी सावंत. मी शिवाजी सावंत यांची दोन-तीन पुस्तके वाचलेली आहेत आणि ती मला फार आवडली. त्यांचे शब्द, बोली समजायला फार सोपी आहे. वाचताना त्यांची भाषा फार आपुलकीची वाटते, कारण जे आपण एकमेकांशी बोलतो तसेच ते सोप्या पद्धतीने आपल्या पुस्तकांमध्ये लिहितात.

शिवाजी गोविंदराव सावंत हे त्यांचे पूर्ण नाव. शिवाजी सावंत यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० मध्ये कोल्हापूरातील एका छोट्या आजऱ्या नावाच्या गावात झाला. शिवाजी सावंत यांचे वडील एक शेतकरी होते. पुढे शिवाजी सावंत यांनी आपले माध्यमिक शिक्षण आपल्याच गावातून पूर्ण केले, नंतर उच्च माध्यमिक शिक्षणासाठी सावंत कोल्हापूरला गेले. तेथे त्यांनी आपल्या बी. ए चे पहिले वर्ष पूर्ण केले. काही काळ सावंतांनी कोर्टात कारकुनाचे काम केले. नंतर कोल्हापुरातील राजाराम महाविद्यालयात शिक्षक म्हणून काम केले. शिवाजी सावंत नंतर पुण्यात स्थायिक झाले. तेथे असताना त्यांनी महाराष्ट्र शिक्षण विभागाच्या ‘लोकशिक्षण’ या मासिकाचे सहसंपादक व नंतर संपादक म्हणून काम केले. १९८३ मध्ये शिवाजी सावंत यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली व पुढील आयुष्य लेखनाकडे केंद्रित केले.



शिवाजी सावंत यांनी अनेक पुस्तके व कादंबऱ्या लिहिल्या आहेत. जसे की, कांचनकण, युगंधर, मृत्युंजय ही त्यांची प्रसिद्ध पुस्तके. मी शिवाजी सावंत यांचे पहिले पुस्तक जे वाचले, ते म्हणजे मृत्युंजय. कारण महाभारतातील कर्ण हे पात्र मला फार आवडते.

मी कर्णाबद्दल फक्त नाटकात व चित्रपटात ऐकलं होतं. मला शूरवीरांच्या बद्दल जाणून घ्यायची व वाचण्याची एक वेगळीच ओढ आहे. जेव्हा मी मृत्युंजय हे पुस्तक वाचले तेव्हा मला असा अनुभव आला की मी प्रत्यक्ष तेथे आहे. सावंत यांचे ते पुस्तक वाचताना मी खूप प्रभावित झालो. सावंत यांचे दुसरे पुस्तक जे मी वाचले ते होते 'छावा'. छावा हा शब्द ऐकून मला एकाच व्यक्तींची आठवण येते ते म्हणजे संभाजी राजे आणि ज्या प्रमाणे शिवाजी सावंत यांनी छावा पुस्तक लिहिले आहे ते अगदी मनावर मोठा प्रभाव टाकणारे आहे.

शिवाजी सावंत हे मराठी कादंबरी लेखनासाठी 'मृत्युंजय' या पुस्तकानंतर फार प्रसिद्ध झाले. त्यांना मृत्युंजय या पुस्तकासाठी अनेक पुरस्कारही मिळाले. जेव्हा मृत्युंजय हे पुस्तक प्रसिद्ध झाले तेव्हा लोक त्यांना मृत्युंजयकार म्हणून ओळखू लागले. शिवाजी सावंत यांना मृत्युंजयासाठी व मराठी भाषेत लेखनासाठी त्यांना मूर्ती देवी पुरस्कार ही देण्यात आला. शिवाजी सावंत हे पहिले मराठी लेखक होते ज्यांना महाराष्ट्रात हा पुरस्कार दिला गेला. पुढे शिवाजी सावंत हे खूप प्रसिद्ध झाले. २००२ मध्ये करड येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचे ते मानकरी ठरले. आपल्या उमेदवारीच्या प्रचारासाठी ते गोव्याला आले असताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांचा तेथेच मृत्यू झाला. शिवाजी सावंत जरी आज आपल्या सोबत नसले तरी त्यांचे मौलिक विचार त्यांच्या लेखनामुळे अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचतील.

# आठवणीतला एक दिवस...

अनामिका सावंत (तृतीय वर्ष, कला शाखा)

आठवणीने बहरला मनाचा हा कोपरा

पावसाच्या सरींनी पुन्हा जाणवला शहरा

आपल्या आयुष्यात असे अनेक प्रसंग घडतात व ते आपल्या मनात घर करून जातात. त्यांच्या आठवणीने कधी मन आनंदून जाते तर कधी मनावर दुःख दाटते. तर असाच एक माझ्या आठवणीतला दिवस सांगायचं म्हटलं तर एक अनपेक्षित भेट मला हमखास आठवते **!....**

तर असाच मुसळधार पाऊस सुरू होता. अशावेळी मला बाहेर फिरायला जायचं सुचलं आणि मी माझी बॅग घेऊन त्यात गरजेच्या वस्तू घातल्या आणि अकराच्या गाडीने मी मालवणला प्रवास करायचा ठरवला. गाडीत बसल्यावर गर्दी असल्यामुळे मला बसायला जागा नाही भेटली. थोड्या अंतरावर पोचले व मला बसायला जागा भेटली आणि धक्के खात खात एकदाची मालवणला पोचले. मी एकटीच असल्यामुळे मला काही समजत नव्हते, त्यात अगदी सुसाट असा वारा व समुद्राच्या लाटा बेफाम उसळत होत्या. मी ठरवल्याप्रमाणे एकटीच घरी परत येण्याचा विचार केला होता. पण माझ्यासोबत असं काही घडेल याची मला अपेक्षा नव्हती.

मी निवांत बसून नजारा बघत होती. पावसाने थोडी विश्रांती घेतली होती, त्यामुळे आकाशात फक्त काळे नभ जमा होते. समोरून एक मुलगी चालत माझ्याजवळ आली. दिसायला गोरी, तरुण व माझ्यासारखी एकटीच प्रवास करत होती. अनोळखी असूनही आमच्यात लगेच मैत्री झाली.

बोलता बोलता आम्ही कधी गुंग झालो हे आम्हाला समजलेही नाही. ती आपल्या आयुष्यातील अनेक प्रसंग सांगू लागली. मीही तिला अनेक गोष्टी सांगितल्या. दोघेही इकडे तिकडे फिरलो, एकमेकींच्या सवयी, स्वभाव ओळखले. परिचय झाला आणि कधी जिवलग मैत्रिणी होऊन बसलो ते कळलंही नाही. तर संध्याकाळी आम्ही दोघी आपापल्या घरी परतलो. अशा प्रकारे ती अनपेक्षित भेट माझ्या आयुष्यात कायमची राहिली आणि आम्ही अजूनही सोबत फिरायला जातो. एकटीने प्रवासाला बाहेर पडलेल्या अशी एक जिवलग ओळख बनेल असा कधी विचार पण केला नव्हता. तो दिवस माझ्या आयुष्यातल्या सुंदर अशा आठवणीतला दिवस झाला.

## लिंगभाव समानता : वास्तव की भ्रम...

शिंधिया गावकर (द्वितीय वर्ष, कला शाखा)

लिंगभाव समानता हा जगातला खूप चर्चेचा आणि महत्त्वाचा विषय आहे. तथापि ही समानता खऱ्या अर्थाने अस्तित्वात आहे का की फक्त भ्रम! लिंगभाव समानता म्हणजे पुरुष आणि स्त्री असा भेदभाव न करता समान संधी आणि समान हक्क देणे. पण प्रत्यक्ष हे किती प्रमाणात साध्य होते हा एक प्रश्न आहे.

आजच्या आधुनिक जगात महिलांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्यासाठी मोठे यश मिळत आहे. महिलांनी विविध क्षेत्रात आपली किर्ती सिद्ध केलेली आहे. तरीही आज ठीकठिकाणी मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. मुलींना फक्त घरातील कामे यायला हवी व त्याने घर सांभाळावे असे समाजातील व घरातील लोकांचे विचार असतात.

स्त्रियांनी शिक्षण घेत यावे, समान वागणूक मिळावी म्हणून सरकारने वेगवेगळे कायदे बनवले. परंतु तरीसुद्धा आपल्याला जगात लैंगिक असमानता दिसून येते. स्त्रियांच्या आयुष्यातील त्यांच्या जीवनातील प्रत्येक काम हा पुरुष ठरवत असतो. स्त्रियांनी फक्त घरातील कामे करणे, मुलांची देखभाल करणे आदी त्यांना आले पाहिजे, असे सर्वसामान्य लोकांचे विचार असतात. जर आपल्याला समानता हवी असेल तर आपणच त्या दृष्टीने बदल करणे गरजेचे आहे.



लोकांच्या मनातून हा लैंगिक भेदभाव दूर केला पाहिजे. जेव्हा मूल लहान असते तेव्हा त्यांच्यात भेदभाव न करता त्यांच्यासमोर समानतेने वागले पाहिजे. पुरुष जे करू शकतो ते सर्व स्त्रियाही करू शकतात. म्हणून मुलामुलींमध्ये भेदभाव न करता समानतेने वागवले पाहिजे.

## आठवणीतला एक दिवस...

पूजा दळवी (द्वितीय वर्ष, कला शाखा)

आयुष्यात असे बरेच दिवस असतात काही चांगले तर काही वाईट, चढ उतार हे तर ठरलेलेच असतात. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात अशा काही आठवणी असतात, ज्या आपण कधीच विसरू शकत नाही. मग ती आठवण कसलीही असू शकते. आपण माणूस खूप खोलवर काही गोष्टी रुजवून ठेवतो. माझ्याही आयुष्यात अशा असंख्य आठवणींचा पसारा आहे.

तर हल्लीच म्हणजे २५ जुलै २०२४ रोजी माझ्या दोन मामेभावांचे अपघातात जागीच निधन झाले. ही घटना मीच काय, कोणीच विचारात सुद्धा आणू शकत नाही. मी जेव्हा हे सगळं ऐकलं मला विश्वास बसला नाही. कारण मामाचे मुलगे अगदीच कोवळ्या वयाचे होते. मोठा २३ वर्षांचा व छोटा भाऊ २० वर्षांचा होता. हे कसं शक्य होऊ शकतं? हा प्रश्न अजूनही माझ्या मनात आहेच. जेव्हा मामा-मामी यांचे अश्रू अनावर होऊन त्या रडत होत्या, तेव्हा मी त्यांच्याकडे गेले आणि धीर देत सांगितलं, "जे होणार होतं ते झालं. आता विसरायचा प्रयत्न करा. आता आपण कुणीच काही बदलू शकत नाही." पण हे बोलल्यानंतर मला माझेच अश्रू अनावर झाले. म्हणजे मला कळतच नव्हतं मी त्यांना कसा आधार द्यावा. मुलं जर झाली नसती तर नाहीत म्हणून गप्प बसता आलं असतं. पण मुले होऊन असं भयंकर काहीतरी घडलंय हे कसं पचवू शकतील ते आई-बाबा. मी त्यांची ती तळमळ बघू शकत नव्हते, पण झालंय ते कधी ना कधी स्वीकारावं लागणार होतंच हेही मला ठाऊक होतं.

"आठवणी काढून टाकाव्यात म्हटलं तरी त्या पुन्हा जाग्या होतातच. तुम्हाला कितीही विसरून पाहू म्हटलं तरी अश्रूंचा डोंगर तुमच्यासाठी कोसळतोच''. त्या आठवणीने मन अगदी सुन्न होतं. काय होतं मध्येच कुणास ठाऊक? हे सत्य स्वीकारावं तर लागणारच हे माहिती असून सुद्धा त्यांची आठवण काढून स्वतःच परत त्यात रमून जाते. आपली माणसं कशी न सांगता येवढी दूर जाऊ शकतात. आपण पुन्हा कधीच भेटू शकत नाही, गप्पागोष्टी, गमती जमती काहीच आता परत अनुभवू शकत नाही. त्यांचा सहवास आजूबाजूला नसणार हेच किती कटू सत्य आहे, जे मला पचवता येत नाही. माझ्या खूप आठवणी आहेत त्यांच्यासोबत आता त्यातच समाधान करून घ्यावे लागणार आहे. खरं तर, मामाच्या मुलांचे आणि माझे नाते खूप जवळचे, कधीच न दुरावणारे असे होते. त्यांना बहिण नव्हती पण मला नेहमी सख्ख्या बहिणीपेक्षाही जास्त प्रेम दिले. वर्षातून फक्त दोन वेळी

आमची भेट  व्हायची. एक मे महिन्यात आणि एक दिवाळीत पण असं कधीच वाटलं नाही की माझ्यापासून ते एवढे लांब निघून जातील. तेही न सांगता पण अजून कितीही काही झालं तरी ते परत नाही येऊ शकत हे स्वीकारावं लागणार आहे. पण आयुष्य हे असंच असतं अशाश्वत! कधी काय कुणाच्या नशिबात असेल हे सांगता येत नाही. पण माझ्याजवळ त्यांच्या या आठवणी मी कायम जपून ठेवीन आणि हा दिवस असाच  माझ्या आठवणीत राहील.



## श्रावण महिन्यातील महत्त्वाचे सण व उत्सव

**कनिष्का संजय देविदास (प्रथम वर्ष, कला शाखा)**

आपल्या गोमंतकात श्रावण महिन्यामध्ये अनेक सण व उत्सव साजरे केले जातात. आपल्या पूर्वजांनी निसर्गालाच देवता मानलेले आहे. आपले सारे सण व उत्सव निसर्गाची सेवा करणारे आहेत, आपले सण आणि निसर्ग यांचे नाते अतूट आहे. निसर्गानेच मानवाला सुसंस्कृत बनवले आहे. सण-उत्सवांमध्ये निसर्गाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. श्रावण महिन्यात प्रामुख्याने तीन सण आपल्याला पाहायला मिळतात. पहिला सण येतो श्रावण शुक्ल पंचमीला तो म्हणजे नागपंचमी. दुसरा सण येतो पौर्णिमेला तो म्हणजे नारळी पौ त्याच दिवशी आपण रक्षाबंधनाचा उत्सव साजरा केला जातो .तिसरा सण येतो,तो म्हणजे, श्रावण कृष्ण अष्टमीला श्रीकृष्ण जन्माष्टमी.

**नागपंचमी** : श्रावण महिन्यातील शुक्लपंचमीला हा सण येतो गोमंतकातील शेतकरी जमात हा सण प्रामुख्याने साजरा करतात. नागपंचमीला नागदेवतेची पूजा केली जाते. गोमंतकाच्या भूमीवर प्रत्येक ठिकाणी आपल्याला नागदेवतेची वारुळे पाहायला मिळतात. स्थानिक भाषेमध्ये याला रोयण असा शब्द आहे. ह्या वारुळाची पूजा त्या दिवशी केली जाते. नगदेवतेला दूध अर्पण केले जाते काही भागात लाह्या नागदेवतेला अर्पण केल्या जातात.

नाग किंवा साप हा शेतकऱ्याचा मित्र प्राणी आहे. कारण तो शेतातील नुकसान करणारे जीव नष्ट करतो. उंदीर अथवा घुस यासारखे शेताची नासाडी करणारे प्राणी साप खाऊन टाकतो. म्हणून शेतकरी नागपंचमीला नागदेवाची पूजा करतात. नागपंचमीला गोडधोड रांधले जाते त्या दिवसाचे खास आकर्षण म्हणजे ‘पातोळया’. तांदळाच्या पिठापासून व नारळाचे खोबरे वापरून गुळाचा वापर, करून हळदीच्या पानांमध्ये गुंडाळून पातोळी बनवली जाते असा हा गोमंतकातील एक महत्त्वाचा सण ‘नागपंचमी’.

**नारळी पौर्णिमा** : श्रावण महिन्यातील पौर्णिमेला हा सण साजरा केला जातो. खास करून कोळीबांधव हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. गोमंतकातील पागी समाज हा सण मोठ्या उत्साहात साजरा करताना आपल्याला पाहायला मिळतात. प्रामुख्याने मासेमारी करणारा समाज हा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करतो. त्या दिवशी समुद्राची पूजा केली जाते. समुद्रामध्ये नारळ अर्पण करून त्या दिवसापासून मासेमारीला सुरुवात केली जाते .याच दिवशी रक्षाबंधन हा भावा-बहिणीच्या नात्यातील पवित्र सण साजरा केला जातो. त्या दिवशी

बहिण भावाला ओवाळते, औक्षण करते, गोडधोड खायला देते व भावाकडून आशीर्वाद घेते. भाऊ सुद्धा या दिवशी आपण बहिणीचे रक्षण करण्याची व तिच्या सुखदुःखात साथ देण्याची शपथ घेतो. बहिण भावाला राखी बांधून हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा सण फक्त गोमंतकात नव्हे तर संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. नारळी पौर्णिमेचा सण सुद्धा फक्त गोमंतकात नव्हे तर संपूर्ण कोकणात साजरा केला जातो.

**जन्माष्टमी** : श्रावण महिन्यातील आणखीन एक महत्त्वाचा सण म्हणजे श्रीकृष्ण जन्माष्टमी. श्रावण महिन्यातील कृष्णाष्टमीला हा सण येतो. हाण गोमंतकाबरोबर संपूर्ण देशभर मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. गोमंतकात जन्माष्टमीला बालकृष्णाची पूजा केली जाते. श्रीकृष्णाचा पाळणा हलवून हा सण साजरा करतात. अनेक ठिकाणी दहीहंडी फोडली जाते. श्रीकृष्णाच्या मडके फोडण्याच्या खोड्या या दहीहंडीच्या उत्सवातून आपल्याला पाहायला मिळतात. जन्माष्टमीच्या दिवशी घरात गोडधोड जेवण करतात, गोमंतकात अनेक ठिकाणी दहीहंडीच्या स्पर्धा होताना आपल्याला पाहायला मिळतात. एकमेकांवर मानवी थर रचून वर बांधलेल्या मडक्याला फोडून त्यातील दही खाणे असा हा दहीहंडीचा खेळ आहे. अशाप्रकारे श्रावण महिन्यात हा श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव संपूर्ण देशभर मोठ्या आनंदात साजरा केला जातो.

**इतर उत्सव** : गोमंतकात श्रावण महिन्यात आणखीन काही उत्सव साजरे केले जातात. गोमंतकातील महिला श्रावण महिन्यातील रविवारी खास पूजा करतात. त्याला ‘आयतर पूजप’ असे म्हटले जाते. ह्या दिवशी केळीच्या पानावर अनेक वनस्पती व त्यांची पाने पुजली जातात. श्रावण महिन्यात रानामध्ये ज्या विविध वनस्पती आढळून येतात त्यांची पाने आणून केळीच्या पानावर मांडली जातात. उदाहरण दूर्वा, सितांसवर, वाघाचे कान, तुळशी इत्यादी अशा अनेक वनस्पती पूजल्या जातात. श्रावण महिन्यात निसर्ग बहरलेला असतो, खुललेला असतो अशा या नटलेल्या निसर्गाची पूजा या दिवशी केली जाते.  आयतार पूजणे म्हणजे निसर्गाची पूजा होय. संध्याकाळी सूर्यास्त होण्यापूर्वी हा आयतार नदीमध्ये किंवा शेतामध्ये पोहोचवला जातो. या दिवशी गोडधोड जेवण करून हा उत्सव साजरा केला जातो.

# धालो

गौरीशा काकोडकर (प्रथम वर्ष, कला शाखा)

गोव्यात अनेक लोकोत्सव साजरे केले जातात. त्यातला एक प्रमुख स्त्रियांचा उत्सव म्हणजे धालोत्सव. हा उत्सव एकूण सात रात्री साजरा केला जातो. पहिल्या रात्री एक विधी होतो. त्या विधीनंतर नऊ दहा वर्षांच्या मुलींना रंभा येते. रंभा म्हणजे एक प्रकारचा भार. त्यांचा एक भाऊ असतो. सुरुवातीला त्या साऱ्या मुली महिलांच्या ओळीत जागा सोडून उभ्या राहतात. जेव्हा त्या सगळया बायका गाणे म्हणायला सुरुवात करतात, तेव्हा त्या मुलींना रंभा येतो आणि त्या तुळशीची प्रदक्षिणा घेऊ लागतात. मधोमध त्या आपल्या भावाला आवाज देतात. तेव्हा त्यांचा भाऊ मंदिरातून बाहेर येतो. आपल्या बहिणींना आवाज देतो, सगळे सात प्रदक्षिणा काढतात. शेवटी ते एक एकटे उठून तुळशीला हळद, कुंकू लावून फुल ठेवतात आणि अक्षता मारतात.

धालो  हे गोमंतकीय लोकनृत्याचा एक प्रकार म्हणून प्रसिद्ध आहे. यात महिलांच्या दोन रांगा केल्या जातात. सोबतच्या सखीच्या कमरेत हात घालून एक रांग गाणे म्हणत पाच पावले पुढे येते नंतर कमरेत वाकून मागे जाते. त्यानंतर दुसरी रांग गाण्याची दुसरी ओळ म्हणत तशीच पुढे येऊन वाकून मागे जाते गायन करत या महिला हे नृत्य खेळत असतात. धालोगीत हा लोकगीताचा प्रकार आहे. हे गीते मौखिक स्वरूपात असल्यामुळे कुठेही लिखित स्वरूपात उपलब्ध नाही. ही लोकगीते स्वरचित आहेत. गीताचा उगम निरक्षर असला तरी ही लोक गीते बोलीभाषेतून म्हणजेच कोंकणी व मराठीतून आहेत. या गीतातून सामाजिक एकता निसर्ग देवदेवतांच्या कथा, धर्म, भाषा, संस्कृतीचे दर्शन घडते. हिवाळा सुरू झाला की जानेवारी महिन्यात कुठेतरी गोव्यातील मांड आणि मंदिर परिसर गाणे आणि मंत्रोच्चाराने जिवंत होतो.  स्त्रिया धालोच्या तालावर नाचतात, यात केवळ वृद्ध नव्हे तर सात दिवसांच्या कोणत्याही कार्यक्रमात न चुकता तरुण महिला आणि मुलीही सहभाग घेतात. अनेक मुलं आवारात धावताना दिसतात.

गोव्यात स्त्रिया सातही दिवस न चुकता धालो उत्सव करतात आणि अशा प्रकारे ही परंपरा जीवंत ठेवली जाते व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत ती जात आहे. शेवटच्या रात्री एक स्त्री नवरा होते तर दुसरी स्त्री नवरी होते. मुंडावळया बांधून नवरा नवरीची वरात सगळीकडे फिरते, म्हणजे मंदिराची प्रदक्षिणा घेते अन्य लोक त्यांना

आहेर देतात, वरात तुळशी पासून येते देवाला नमस्कार केला जातो अशा प्रकारे लग्न सोहळा साजरा केला जातो. यात पिंगळी अभिनय प्रमुख असतो. मांडकरी बाई डोक्याला फेटा बांधून पिंगळी बांधून येते. बरोबर चार पाच बायका पण घेऊन येते. तिच्या एका हातात मुसळ तर दुसऱ्या हातात तांब्या असतो, ती मांडावर गाणे गात फिरते व त्यात लोकं पैसे घालतात.

लग्न आणि पिंगळ्या नंतर शिकारी करण्याचा अभिनय केला जातो. सावज मिळाले म्हणून बायका मांडवातल्या गुरुला प्रदक्षिणा घालतात. शिकार करण्याचा अभिनय बायकाच करतात. *"भिल्ले भिल मोरा, पादरी मासा भुकेला, पादरच्या गळ्यात सरपळी, पादरी नाचता गोयच्या हाटीर"* असे म्हणत पाच प्रदक्षिणा काढल्यानंतर सावज मिळते. यात सावज बनण्याचे काम मात्र एखादा पाच सहा वर्षांचा अशक्त मुलगा करतो. त्याला कांबळीत लपवून ठेवतात, सावज मिळाले म्हणून बायका आनंदाने धुंद होऊन नाचत नाचत मांडवात घेऊन येतात. सातव्या दिवशी त्या जमातीची सगळी लोकं तिथे उपस्थित असतात. अशा प्रकारे धालोत्सव मोठ्या आनंदात गोव्यात साजरा केला जातो.




# जन्माष्टमी

मनस्वी गोसावी (प्रथम वर्ष, कला शाखा)

श्रीकृष्ण ही एक हिंदू देवता आहे. त्यांना सर्वोच्च देवता मानले जाते. त्यांचा जन्मदिवस जन्माष्टमी म्हणून साजरा केला जातो. हा सण भारतात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो, श्रीकृष्णाचा जन्म मथुरा नगरीमध्ये माता देवकी व पिता वासुदेव यांच्या पोटी झाला होता. कृष्ण हा विष्णूचा आठवा अवतार आहे. कंसाचा वध करण्यासाठी भगवान विष्णूने हा अवतार घेतला होता, त्याला कृष्णावतार असे म्हणतात.

लोक मध्यरात्री जन्माष्टमी साजरी करतात, कारण श्रीकृष्णाचा जन्म तेव्हा झाला होता. शिवाय सण साजरा करण्याची लोकांची एक खास पद्धत आहे. कृष्णाला दही खाण्याची खूप आवड असल्याने, लोक खेळ खेळतात, खेळ म्हणजे मातीचे मडके घेऊन त्यात दही घालतात. ही मडकी उंचावर बांधली जाते व ति फोडली जाते. हा एक मनोरंजक खेळ आहे. हा खेळ पाहण्यासाठी बरेच लोक जमतात. हा उत्सव घरामध्ये देखील साजरा केला जातो. जन्माष्टमीच्या दिवशी लोकांची मंदिरात बरीच गर्दी असते. मंदिरात दिवसभर घंटा आणि मंत्रांचा आवाज ऐकू येतो.



## आख्यायिका

### गोव्यातील सात बहिणी आणि एक भाऊ यांची कहाणी...

भावना नाईक (प्रथम वर्ष, कला शाखा)

गोव्यात विविध दैवते आहेत. त्यांचे सण-उत्सव नावीन्यपूर्ण रीतीने साजरे केले जातात. गोव्यातील सात बहिणी व त्यांचा एक भाऊ ही दैवते अत्यंत लोकप्रिय आहेत. ह्या सात बहिणी म्हणजे केळबाई, महामाया, मोरजाई, शितलादेवी, अज्या दीपा, लईराई आणि मीराबाई व भाऊ खेतोबा.

एकदा सात बहिणी आणि त्यांचा एक भाऊ डोंगरावरून चालत एका गावी आले. त्यांनी त्यांच्या भावाला म्हणजे खेतोबाला अन्न शिजवण्यासाठी लाकडे आणायला सांगितली. तो जाता जाता त्याने पाहिले की काही मुले तिथे खेळत होती. तो त्यांना पाहायला दंग झाला. बहीण जेव्हा त्याला शोधायला गेली तेव्हा तिने पाहिले की हा खेळ बघण्यास दंग झालेला आहे. तेव्हा तिने रागाने त्याच्या पाठीवर लाथ हाणली. तेव्हापासून खेतोबा कमरेतून वाकल्यासारखा दिसतो.

ह्या आख्यायिका लोकांच्या मनावर आपला एक वेगळा प्रभाव पाडत असतात. ह्या आख्यायिका पिढ्यांपिढ्या संक्रमित होऊन नव्या पिढईपर्यंत पोहोचतात. त्यामुळे ह्या आख्यायिकांना विशेष महत्त्व आहे.





## शिक्षणासाठीची धडपड

**अनिशा प्रकाश गावकर (तृतीय वर्ष, कला शाखा)**

जीवन ही सुख-दुःखाची वीण असते. माझ्याही जीवनात असे काही प्रसंग आलेले आहेत. काही सुखी तर काही दुःखी. मात्र एक प्रसंग माझ्या कायम आठवणीत राहणारा आहे. तो दिवस खूप भीतीदायक होता. त्या क्षणी जीवंतपणीच मला माझा मृत्यू दिसला. आजही तो दिवस आठवला तर अंगावर शहरा येतो.

माझ्या लहानपणी गावात फारसे पक्के रस्ते नव्हते. सुख-सुविधा नव्हत्या. गाव लहान असला तरीही सुंदर होता आणि माणसेही प्रेमळ होती. शिक्षणासाठी गावात सोय नव्हती. त्यामुळे शेजारच्या गावात जावे लागायचे. गावात १२ ते १५ एवढी घरे होती. गावात शाळा नसल्याने रोज पहाटे लवकर उठून स्वतःच सगळं काम आवरून रान वाटेने शाळेत जायचो. रानातून जाताना थोडी भीती वाटायची. वाटेत रानटी प्राणी भेटले तर? कसे बसे दिवस निघत होते. उन्हाळ्यात व हिवाळ्यात तितका त्रास होत नव्हता. मात्र  पावसाळ्यात शाळेत जाणे म्हणजे खूप अवघड होते. शाळेला जाताना अर्धा तास लागायचा. साधारण एक की. मी. चालत जावे लागायचे. मध्ये तीन वेळा ओहोळ लागायचा. पावसाळ्यात ते पार करून जाणं खूपच कठीण होतं. कारण आम्ही लहान होतोच व शरीरानेही कमकुवत होतो. एकट्याने ओहोळ पार करण्याइतकी अंगात शक्ती नव्हती.

पावसाळ्यात आम्हा सर्व मुलांना ओहोळ पार करून देण्यासाठी आमच्यासोबत आमचे कोणी आई, बाबा यायचे. सगळ्यांना पावसाळा आवडतो पण आमच्या गावातील मुलांना अजिबात आवडत नव्हता. त्यात शेजारच्या गावात फक्त ७ वी पर्यंत शिकवले जायचे. पुढील शिक्षणासाठी अजून दूर जावे लागायचे.

एका दिवशी असंच पावसाळ्यात रोजच्या प्रमाणे मी शाळेत गेले. शाळेत दिवस छान गेला म्हणून मी माझ्याच खुशीत होते. अचानक जोरदार पाऊस पडू लागला, वादळ आले. आमच्या गावात जाणारी आम्ही तीघी होतो. मोठ्या वेगाने येणाऱ्या पावसातून आम्ही घरी जाण्यासाठी निघालो. अर्ध्या वाटेत पोहोचता-पोहोचता माझा अर्धा गणवेश भिजून ओला-चिंब झाला. काही वेळात पाऊसही ओसरला. वाटेत लागणारे दोन ओहोळ आम्ही एकमेकींचे हात पकडून कसेबसे पार केले. घरून न्यायला कुणीच आलं नव्हतं. पुढे तिसरा ओहोळ लागला. त्यात पाण्याची पातळी बरीच वर होती. परंतु घरी जायला काही तरी करावे तर लागणारच. म्हणून मी पुढाकार घेतला आणि पाण्यात पाय घालून साधारण चार पावलं चालले. अचानक पाण्याचा वेघ वाढला आणि माझे दोन्ही पाय थरथर कापू लागले व माझा तोल गेला. मी पाण्यात पडले व साधारण ३० की. मी. वाहून गेले. शेवटी एका

झाडाची फांदी मी पकडली व भीतीने रडत, ओरडत राहिले. एका भल्या माणसाने माझा आवाज ऐकला. मला वाचवले व घरच्यांना जाऊन सांगितले.

तो क्षण इतका भयंकर होता की मला त्या क्षणी असं वाटलं की मी आता कशीच जीवंत राहू शकणार नाही. मला माझा मृत्यू दिसला होता. त्या दिवसापासून मला पाण्याची खूप भीती वाटते.



सी.ई.एस. महाविद्यालय, कुंकळ्ळी

# मराठी विभाग

॥युवांकुर॥